**फौजदारी जामीन अर्ज क्र. ४६/२०२६**
**पंचशिला सुनिल वानखेडे**
**वि.**
**महाराष्ट्र शासन**
**(CNR NO. MHBU20-000103-2026)**

## नि.क्र. १ खाली आदेश
**(पारीत दिनांक ११ मार्च २०२६)**

**०१]** प्रस्तुतचा अर्ज; अर्जदार – **पंचशिला सुनिल वानखेडे** हिने भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८२ अन्वये पोलीस ठाणे, जानेफळ येथील अपराध क्र. ३६७/२०२५, कलम ११८(१), ११८(२), ११५(२) भारतीय न्याय संहिता खालील प्रकरणात अटकपूर्व जामीन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**०२]** अभियोग पक्षाच्या कथेनुसार फिर्यादी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाइक आहेत. दिनांक २०.१०.२०२५ रोजी सकाळी ०६.३० वाजेच्या सुमारास फिर्यादीची नात ही दात घासत होती. त्यावेळी फिर्यादीची सुन तिला म्हणाली की, ''तू काहुन दात काढुन राहीली''. त्यावेळी फिर्यादीच्या भावाची बायको पंचशिला सुनिल वानखेडे ही घरासमोरुन जात होती, ती थोडे पुढे जावुन परत आली व फिर्यादीच्या सुनेला म्हणाली की, ''तु मला पाहुन का बोलु राहली'', तेव्हा फिर्यादीची सुन म्हणाली की, ''मी तुला बोलले नाही, माझे मुलीला बोलले''. तेव्हा पंचशिला वानखेडे ही परत तिचे घरी गेली आणि आरोपी क्र. १) पंचफुला सुनिल वानखेडे, २) पंचशिला सुनिल वानखेडे, ३) निखील सुनिल वानखेडे, ४) यश सुनिल वानखेडे हे त्याठिकाणी आले.

**०३]** आरोपी क्र. ३) निखील वानखेडे याने त्याचे हातातील लोखंडी गुप्तीने

फिर्यादी छगन शंकर वानखेडे याचे डोक्यावर मारून जखमी केले. आरोपी क्र. ४) यश वानखेडे याने त्याचे हातातील कुऱ्हाड फिर्यादीचे डावे हाताचे बोटावर मारली, त्यामुळे दुखापत होवुन रक्त निघाले. आरोपी क्र. २) सुनिल वानखेडे याने त्याचे हातातील कुऱ्हाड फिर्यादीचे बरगडीवर मारून मुक्का मार दिला आणि आरोपी क्र. १) पंचफुला वानखेडे हिने फिर्यादीचे केस धरून खाली ओढले व लाथाबुक्यांनी मारहाण केली. अशा आशयाची फिर्याद पोलीस ठाणे, जानेफळ येथे दाखल करण्यात आली.

**०४]** अर्जदारांच्या वतीने विद्वान विधिज्ञ श्री. अर्जुन तुपे यांनी युक्तिवाद केला की, अर्जदार व फिर्यादी हे एकमेकांचे नातेवाईक आहेत. या प्रकरणात इतर आरोपींना जामीन मिळालेला आहे. अर्जदारावर केस धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली इतकाच आरोप आहे. अर्जदाराकडून काहीही जप्त करणे नाही. घटना ही दिनांक २०.१०.२०२५ रोजीची असून पोलिसांनी जाणीवपूर्वक मागील तारखेस कलम ११८(२) भारतीय न्याय संहिता या गुन्ह्याची वाढ केलेली आहे. या प्रकरणातील जखमीला दवाखान्यातुन सुट्टी मिळाली असून तो आपले सहजिवन जगत आहे. या प्रकरणातील महत्त्वपूर्ण तपास संपलेला आहे. त्यामुळे अर्जदाराच्या कोठडीची आवश्यकता भासणार नाही. अर्जदाराला अटकपूर्व जामीन मिळाल्यास ती कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. अर्जदार तपासात संपूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे. म्हणून अर्जदाराला अटकपूर्व जामीनावर सोडण्याची विनंती करण्यात आली.

**०५]** याउलट, विद्वान सरकारी वकील श्री. यु. एस. आपटे यांनी तपासी अंमलदाराच्या म्हणण्यावर जोर देऊन युक्तिवाद केला की, आरोपींनी सगणमत करून फिर्यादीला घातक शस्त्रांनी मारहाण करून गंभीर दुखापत केलेली आहे. या प्रकरणाचा

तपास प्रगतीपथावर असून, अर्जदार ही घटनेच्या दिवशी पासून फरार आहे. अर्जदाराला अटकपूर्व जामीन मिळाल्यास ती साक्षीदारांवर दबाव टाकून त्यांना फितूर करू शकते. अर्जदाराला जामीन मिळाल्यास ती अशाच स्वरूपाच्या गुन्ह्याची पुनारावृत्ती करू शकते. म्हणून अर्जदाराचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०६]** दोन्ही पक्षाच्या युक्तीवादाच्या अनुषंगाने केस पेपरची पाहणी केली असता असे दिसून येते की, अर्जदाराविरूद्ध फिर्यादीचे केस धरून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली इतकाच आरोप आहे. अर्जदाराविरूद्धचे आरोप पाहता अर्जदाराकडून काहीही जप्त करणे नाही. त्यामुळे अर्जदाराच्या कोठडीची कोणतीही आवश्यकता नाही. अर्जदाराविरूद्ध नोंद असलेला गुन्हा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांच्या कार्यक्षेत्रातील आहे. त्यामुळे या सर्व बाबी बचाव पक्षाच्या युक्तिवादाचे समर्थन करतात.

**०७]** अर्जदार ही महिहला आहे. अर्जदाराची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी असल्याचे अभियोग पक्षाच्या म्हणण्यावरून दिसून येत नाही. अर्जदार ही तपासात पूर्ण सहकार्य करण्यास तयार आहे आणि तिला जामीन मिळाल्यास ती जामीन आदेशावरील कोणत्याही अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. याउलट, अभियोग पक्षाला असलेली भीती आणि साक्षीदारांचे संरक्षण कठोर अटी व शर्ती लादून केल्या जाऊ शकते. म्हणून अर्जदार ही अटकपूर्व जामीन मिळवण्यास पात्र आहे.

## – आ दे श –

**०१]** अटकपूर्व जामीन अर्ज क्र. ४६/२०२६ मंजूर करण्यात येतो.

**०२]** अर्जदार – **पंचशिला सुनिल वानखेडे** हिला अटक होतेवेळेस पोलीस ठाणे,

जानेफळ येथील अपराध क्र. ३६७/२०२५, कलम ११८(१), ११८(२), ११५(२) भारतीय न्याय संहिता खालील गुन्ह्यात तिचे वैयक्तिक रू. ५०,०००/– चे बंधपत्र व सदर रकमेचा जामीनदार दिल्यानंतर अटकपूर्व जामीनावर सोडण्यात यावे.

**०३]** अर्जदार हिने तपासात सहकार्य करावे आणि दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत दर शनिवारी तपासी अंमलदारापुढे दुपारी ०२.०० ते ०४.०० वाजेच्या दरम्यान हजर राहावे.

**०४]** अर्जदार हिने अभियोग पक्षाच्या साक्षीदारांवर दबाव आणू नये किंवा साक्षीदारांना कोणत्याही स्वरूपाचे प्रलोभन दाखवून फितूर करू नये.

**०५]** अर्जदार हिने यापुढे कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा करु नये.

**०६]** अर्जदार हिने वरील अटी व शर्तींचा भंग केल्यास तिची जमानत रद्द करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात लिखित व घोषित)

SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Digitally signed by SAGAR KRISHNARAOJI MUNGILWAR
Date: 2026.03.13 15:26:03 +0530

**(सागर कृ मुंगीलवार)**
**अतिरिक्त सत्र न्यायाधीश**
**मेहकर**

**दिनांक – ११.०३.२०२६**
**ठिकाण – मेहकर**

मी, खात्रीपूर्वक असे कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/न्याय–निर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे /न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

न्यायालयाचे नांव – श्री. सागर कृ मुंगीलवार,
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर.

लघुलेखकाचे नांव – शेख इम्रान अब्दुल रऊफ,
लघुलेखक ग्रेड – १, मेहकर

दिनांक – ११.०३.२०२६